दिनांक - 03/07/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.09

विषय - विटा नगरपरिषदेच्या नवीन जाहिरात धोरणानुसार परवाना देणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ – 1) मा.मुख्याधिकारी यांनी विभाग प्रमुख यांची दिनांक - 02/07/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.

महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायत आकाश-चिन्हे (स्काय साईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण मार्गदर्शक तत्वे, 2023 यामधील नमूद मार्गदर्शक तत्वानुसार विटा नगरपरिषदेने प्रशासकीय ठराव क्रमांक 172 दिनांक 10.11.2023 ने जाहीरात धोरण प्रसिध्द केले आहे. सदर जाहीरात धोरणाची वर्तमानपत्राव्दारे तसेच शहरात बोर्ड लावून व्यापक प्रसिध्दी करणेत आली होती व याव्दारे विनापरवाना जाहीरात लावलेल्या आस्थापनांना परवानगीसाठी अर्ज करणेबाबत कळविले होते.

विटा नगरपरिषद हद्दीतील जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन व नियंत्रण करण्यासाठी प्रशासकीय ठराव नं.199 दिनांक 12.12.2023 ने शहरातील नियंत्रण समिती स्थापन करण्यात आली. यासाठी नगरपरिषदेकडून संबंधित आस्थापनांचा सर्व्हे करणेकामी टीम तयार करून नवीन जाहीरात धोरणातील जाहीरातीच्या दरानुसार जाहीरातीची रक्कम निश्चित करून सर्व आस्थापनांना नोटीसा देवून कळविण्यात आले होते. त्यानुसार शहरातील ब-याच आस्थापना धारकांनी नवीन जाहिरात धोरणानुसार फी भरण्यात आली आहे. सदर फी भरलेल्या आस्थापना धारकांना नवीन जाहिरात धोरणानुसार परवाना देणे आवश्यक आहे. तरी विटा नगरपरिषदेच्या नवीन जाहिरात धोरणानुसार परवाना देणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा